मासिक

# स्वराज दुनिया

संपादक : शिवाजी बबन खेडकर मो. नं. ८०५५७२२११०

■ RNI No. : MAHMAR/2024/89748
■ DECL NO : SDM/SR/06/2024 Dt. : 16/02/2024
■ unoindia1977@gmail.com

■ वर्षे २ रे ■ अंक ९ ■ नोव्हेंबर २०२५ ■ मुल्य : २५ रु ■ वार्षिक वर्गणी : २५० रु. ■ पान ४


# पुढच्या आठवड्यात आचारसंहिता?

■ **सर्वप्रथम कोणत्या निवडणुकांचा बार उडणार?**

**मुंबई :** प्रमुख विरोधी पक्षांनी आधी मतदारयाद्या दुरुस्त करा आणि नंतर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची मागणी केली असली, तरी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात या निवडणुकांचा बिगुल फुंकला जाणार असल्याचे समजते. आधी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपरिषदा व नगरपंचायती यांच्या निवडणुका घेण्याची तयारी राज्य निवडणूक आयोगाने केली असून, यापैकी सर्वप्रथम कोणत्या निवडणुकांचा बार उडतो, याकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक प्रक्रिया जानेवारी महिन्याच्या अखेरीपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने या निवडणुकांसाठी तयारी सुरू केली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी गट आणि गण रचना, आरक्षण जाहीर केले आहे. नगरपरिषद आणि नगरपंचायतींसाठीही नगराध्यक्ष आरक्षण, प्रभाग रचना, तसेच प्रभागनिहाय आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. महापालिकांसाठी प्रभाग रचना तयार केली असली, तरी अजूनही आरक्षण जाहीर करणे बाकी आहे.

उपलब्ध माहितीनुसार, प्रथम जिल्हा परिषद, पंचायत समिती, तसेच नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुका घेतल्या जाणार आहेत. त्यातही नगरपरिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका आधी होण्याची शक्यता आहे. त्यानंतर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक घेतली जाईल, अशी चर्चा आहे, हा क्रम बदलूही शकतो. सर्वात शेवटी महापालिका निवडणुकांचा रणसंग्राम होईल, अशीही शक्यता आहे.

# एकनाथ खडसेंच्या घरी चोरी

■ **सोन्याच्या अंगठ्यांसह रोख रक्कम लंपास**

**जळगाव :** राष्ट्रवादी शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांच्या जळगावातील निवासस्थानी चोरी झाली आहे. एकनाथ खडसे यांच्या जळगावमधील निवासस्थानी चोरट्यांनी मध्यरात्री दरवाजाचे कुलूप तोडत खोल्यांमधील कपाट उघडून चोरी केली आहे. घटनास्थळी पोलिस अधिकारी तसेच कर्मचारी दाखल झाले असून त्यांच्याकडून पाहणी केली जात आहे. आज सकाळी नेहमीप्रमाणे घरकामगार साफसफाई करण्यासाठी आल्यानंतर हा प्रकार उघड झाला आहे.

दिवाळीनिमित्त एकनाथ खडसे हे बाहेरगावी होते. त्यांच्या या घरात एक सुरक्षारक्षक असतो. पण तोही सुटीवर होता. ही संधी साधत चोरट्यांनी एकनाथ खडसे यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यांनी घरातील सर्व कपाटं उचकली. सामान अस्ताव्यस्त केले. त्यांनी ५ ग्रॅम वजनाच्या ४ सोन्याच्या अंगठ्या आणि ३५ हजार रुपये रोख रक्कम लांबवल्याची माहिती एकनाथ खडसे यांनी दिली. तर रक्षा खडसे यांच्या खोलीतही त्यांनी प्रवेश केला आणि चोरी केल्याचे समोर आले आहे.

या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे असतील किंवा इतर काही गोष्टींची जुळवाजुळव पोलिस अधिका-यांकडून केली जात आहे. तळमजल्यावरील खोल्या तसेच पहिल्या मजल्यावरील खोल्यांमधील कपाटे तोडून त्यातील मुद्देमाल चोरून नेला आहे.

# तात्काळ करा ई- केवायसी अन्यथा लाभ होणार बंद

■ **लाडकी बहिण योजनेसंबंधी आदिती तटकरे यांचे आवाहन**

**मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये पारदर्शकता येण्यासाठी व लाभार्थ्यांना नियमितपणे आर्थिक लाभ मिळण्यासाठी ई-केवायसी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आता पर्यंत लाखों महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली असून उर्वरित लाभार्थी भगिनींनीही १८ नोव्हेंबर २०२५ पूर्वी ई- केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी असे मी सर्वांना आवाहन करते, असे आदिती तटकरे म्हणाल्या.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेदरम्यान, अनेक फसवणुकीचे प्रकार समोर आले. यानंतर राज्य सरकारकडून योग्य ती खबरदारी घेत पडताळणी सुरू केली आहे. याचदरम्यान आता लाडकी बहीण योजनेसाठी ई- केवायसी बंधनकारक करण्यात आली आहे. त्यानुसार आता लाडक्या बहिणींना दरवर्षी केवायसी करावी लागणार आहे.

केवायसी प्रक्रियेत अधिक सुसूत्रता आणण्याबाबत २९ ऑक्टोबर रोजी मंत्रालयात बैठक घेतली. दिनांक १८ सप्टेंबर २०२५ पासून https://ladakibahin.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर ई- केवायसी सुविधा उपलब्ध आहे. यासाठी २ महिन्यांचा कालावधी देण्यात आला असून आतापर्यंत बहुतांश लाडक्या बहिणींनी ही प्रक्रिया पूर्ण केली आहे.

उर्वरित लाभार्थी भगिनींनीही १८ नोव्हेंबर २०२५ पूर्वी ई- केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी असे मी सर्वांना आवाहन करते, असं आदिती तटकरे म्हणाल्या.

# राज्यावर ‘मोंथा’चे संकट


■ **महाराष्ट्रातील भागात मुसळधार पावसाची शक्यता**

**मुंबई :** महाराष्ट्रासह ५ राज्यांवर ‘मोंथा’ चक्रीवादळाचे संकट घोंघावत आहे. मोंथा चक्रीवादळामुळे आंध्र प्रदेश किना-यावर मोठ्या प्रमाणात स्थलांतर सुरू आहे. वाढता धोका पाहता सरकारने पाचही बाधित राज्यांमध्ये २२ एनडीआरएफची पथके तैनात केली आहेत.

आतापर्यंत आंध्र प्रदेश, ओडिशा, पुद्दुचेरी, तामिळनाडू आणि छत्तीसगडमधील सर्व बाधित भागात एनडीआरएफ पथके तैनात करण्यात आली आहेत.

पुढील २४ तासांच्या आत २८ ऑक्टोबरच्या रात्री आंध्र प्रदेशच्या समुद्रकिना-यावर मछलीपट्टणम आणि कलिंगपट्टणम दरम्यान काकीनाडाजवळ मोंथा चक्रीवादळ धडकण्याचा अंदाज आहे. ‘मोंथा’ चक्रीवादळामुळे महाराष्ट्रातील विदर्भात २८ ते ३० ऑक्टोबर दरम्यान मध्यम ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने याबाबत घोषणा केली.

चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, वाशिम, यवतमाळ, भंडारा, गोंदिया आणि नागपूरमधील काही ठिकाणी मुसळधार पाऊस, ढगांचा गडगडाट आणि ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने जोरदार वारे वाहण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. हवामान विभागाकडून या भागात ‘यलो’ अलर्ट जारी करण्यात आला आहे.




## संपादकीय

# न्या. सूर्यकांत नवे सरन्यायाधीश

देशाचे विद्यमान सरन्यायाधीश भूषण गवई यांचा कार्यकाल २३ नोव्हेंबर २०२५ रोजी संपणार आहे त्यामुळे आता केंद्र सरकारने पुढील सरन्यायाधीश निवडण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. नियमानुसार सर्वोच्च न्यायालयातील सर्वात वरिष्ठ न्यायाधीश हे पद भूषवत असतात. विद्यमान सरन्यायाधीश नव्या सरन्यायाधीश पदाच्या नावाची शिफारस करत असतात. त्यानुसार सरन्यायाधीश भूषण गवई हे सोमवारी (२७ ऑक्टो.) नवे सरन्यायाधीश म्हणून न्या. सूर्यकांत यांच्या नावाची शिफारस करतील. सरन्यायाधीश गवई भूतान दौ-यावर होते.

ते केंद्र सरकारकडे न्या. सूर्यकांत यांच्या नावाची औपचारिक शिफारस करतील. या संदर्भात बोलताना सरन्यायाधीश गवई म्हणाले, केंद्र सरकारकडून आपल्या कार्यालयाला पुढील सरन्यायाधीशांसाठी शिफारस मागवणारा संदेश मिळाला आहे. सरन्यायाधीश गवई यांच्यानंतर न्या. सूर्यकांत हे वरिष्ठ न्यायाधीश आहेत. सूर्यकांत हे हरियाणातील हिसार येथील रहिवासी आहेत. त्यांचा जन्म मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांचे वडील शिक्षक होते. सूर्यकांत यांनी मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण गावातील सरकारी शाळेत पूर्ण केले. १९८१ मध्ये हिसार येथील सरकारी पदव्युत्तर महाविद्यालयातून पदवी आणि १९८४ मध्ये रोहतक येथील महर्षी दयानंद विद्यापीठातून कायद्याची पदवी मिळवली. सूर्यकांत यांनी न्यायाधीश पदावर येण्यापूर्वी हरियाणाचे महाधिवक्ता म्हणून काम केले. वयाच्या ३८ व्या वर्षी ७ जुलै २००० रोजी ते हरियाणाचे ॲडव्होकेट जनरल म्हणून नियुक्त झाले.

राज्याच्या इतिहासातील सर्वांत तरुण ॲडव्होकेट जनरल म्हणून त्यांनी हा मान मिळवला. संवैधानिक सेवा आणि कायद्यातील कौशल्यासाठी ते ओळखले जातात. न्या. सूर्यकांत यांची न्यायालयीन कारकीर्द चार दशकांहून अधिक काळाची आहे. ते हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीशही होते. सध्या ते सर्वोच्च न्यायालयाच्या कायदेशीर सेवा समितीचे अध्यक्ष म्हणूनही काम करत आहेत. भारताचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती निश्चित झाली आहे. २४ नोव्हेंबर रोजी न्या. सूर्यकांत देशाचे नवे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारतील. ते ९ फेब्रुवारी २०२७ पर्यंत पदावर कार्यरत राहतील. त्यांचे बालपण अत्यंत साध्या वातावरणात गेले. १९८४ साली रोहतक येथून कायद्याची पदवी घेतल्यानंतर त्याच वर्षी त्यांनी हिसार येथील जिल्हा न्यायालयात वकिली सुरू केली. पुढील वर्षी त्यांनी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालय, चंदीगड येथे प्रॅक्टिस सुरू केली. संवैधानिक, सेवा आणि नागरी कायद्यावरील त्यांच्या सखोल ज्ञानामुळे आणि प्रभावी युक्तिवादामुळे त्यांना न्यायक्षेत्रात वेगळी ओळख मिळाली. ९ जानेवारी २०२४ रोजी ते पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे स्थायी न्यायमूर्ती झाले.

त्यांच्या न्यायालयीन कार्यकाळात सामाजिक न्याय, आरक्षण, सार्वजनिक साधनसंपत्तीचे संरक्षण, भूमी अधिग्रहण आणि पीडितांच्या हक्कांबाबत त्यांनी दिलेले निर्णय समाजाभिमुख आणि संतुलित दृष्टिकोनाचे उदाहरण ठरले. ५ ऑक्टोबर २०१८ रोजी सूर्यकांत यांची हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. या काळात त्यांच्या प्रशासनिक कौशल्याची आणि न्यायिक दृष्टिकोनाची व्यापक प्रशंसा झाली. त्यांच्या निर्णयामध्ये सामाजिक संवेदनशीलता आणि संवैधानिक मूल्यांचे पालन स्पष्टपणे दिसून आले. केंद्रीय कायदा मंत्रालयाने नव्या सरन्यायाधीशांच्या नियुक्तीची प्रक्रिया सुरू केली आहे. प्रथेनुसार, विद्यमान सरन्यायाधीश आपल्या उत्तराधिका-याचे नाव सरकारकडे सुचवतात. विद्यमान सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या सेवानिवृत्तीपूर्वीच या प्रक्रियेचा औपचारिक समारोप होणार असून त्यानंतर न्या. सूर्यकांत देशाचे सर्वो च्च न्यायाधीश म्हणून न्यायासनावर विराजमान होतील. हरियाणातील एका साध्या गावातून सुरू झालेला हा प्रवास आता देशाच्या सर्वोच्च न्यायव्यवस्थेच्या शिखरावर पोहोचला आहे. न्या. सूर्यकांत यांचे आयुष्य आणि कार्य हे केवळ न्यायक्षेत्रातील नव्हे तर समाजातील सर्वांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. सध्या कॉलेजियम प्रणालीबद्दल बरेच काही बोलले जाते. त्याबद्दल न्या. सूर्यकांत यांनी अलिकडेच आपले मत व्यक्त केले आहे. त्यांच्या मते न्यायालयीन नियुक्त्यांसाठी कॉलेजियम प्रणाली महत्त्वाची आहे. भारतीय न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य राखण्यासाठी आणि सरकारच्या तिन्ही संस्थांमध्ये संतुलन राखण्यासाठी कॉलेजियम प्रणाली महत्त्वाची आहे. न्या. सूर्यकांत म्हणाले, भारत सत्ता विकेंद्रीकरण तत्त्वाच्या वापराचे एक उत्तम उदाहरण आहे. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांमधील नियुक्त्यांवर न्यायव्यवस्थेचा अधिकार हे याचे एक प्रमुख उदाहरण आहे. ही यंत्रणा न्यायालयाच्या आत आणि बाहेर प्रशासकीय कामकाजाबाबत न्यायव्यवस्थेची स्वायत्तता जपते. न्यायालयीन पुनरावलोकनासारख्या मुद्यांवर आपले विचार व्यक्त करताना न्या. सूर्यकांत म्हणाले, न्यायालयीन पुनरावलोकन भारतीय न्यायव्यवस्थेला सरकारच्या प्रत्येक निर्णयाच्या घटनात्मक वैधतेची तपासणी करण्याचे अधिकार देते. न्यायालयीन पुनरावलोकनामुळे हे निश्चित होते की, सरकारचे कोणतेही काम न्यायालयीन देखरेखीच्या कक्षेबाहेर राहणार नाही. नवे सरन्यायाधीश होणारे न्या. सूर्यकांत २४ नोव्हेंबर रोजी पदभार स्वीकारतील आणि सुमारे १५ महिने सरन्यायाधीश म्हणून काम पाहतील. त्यांचा कार्यकाल ९ फेब्रुवारी २०२७ रोजी संपण्याची शक्यता आहे. नव्या सरन्यायाधीशांना उज्ज्वल कार्यासाठी शुभेच्छा!

# अचानक सदिच्छा भेट!

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या निमित्ताने सर्वच राजकीय पक्षांची मोर्चेबांधणी सुरू आहे. त्या अनुषंगाने महायुती एकत्र लढणार की स्वबळावर याबाबत अजून स्पष्टता झालेली नाही. मात्र, महायुतीत अंतर्गत धुसफूस सुरू असल्याचे दिसून येत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अचानक दिल्ली वारी केल्याने त्यासंबंधीच्या चर्चेला उधाण आले आहे. आज अचानक गाठ पडे.. असा काही प्रकार दिसत नाही, पण त्यामागे काही तरी गौडबंगाल असावे असे बोलले जात आहे. मुंबईत सत्ता काबीज करण्यासाठी भाजपकडून हालचालींना वेग आला आहे. दीडशेपेक्षा अधिक उमेदवार मैदानात उतरवण्याची तयारी भाजपने चालवली आहे. त्यामुळे शिवसेना शिंदे गटाला ६० ते ७५ जागा दिल्या जातील अशी चर्चा आहे. भाजपने बीएमसीसाठी 'दीडशे पार'चा नारा दिला असतानाच अचानक उपमुख्यमंत्री शिंदे हे दिल्ली दौ-यावर गेले. शुक्रवारी मध्यरात्री ते दिल्लीला रवाना झाले. शिंदेंच्या या दिल्लीवारीचे कारण मात्र समजू शकले नाही.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते भाजपच्या वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करण्यासाठी दिल्लीला गेल्याचे बोलले जात आहे. यापूर्वी देखील शिंदे यांनी अनेकवेळा अचानक दिल्ली दौरे केले आहेत. दिल्लीत जाऊन त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि जे. पी. नड्डा यांच्या भेटी घेतल्या होत्या. आता पुन्हा एकदा अचानक शिंदे दिल्ली दौ-यावर गेल्याने त्यांची ही दिल्लीवारी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण मानली जात आहे. शिंदे यांच्यासोबत त्यांचे चिरंजीव खासदार श्रीकांत शिंदेही आहेत. त्यांनी अमित शहा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही भेट घेतली. त्या संदर्भात शिंदे म्हणाले, दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी पंतप्रधान मोदींची भेट घेतली. दिवाळीदरम्यान पंतप्रधान व्यस्त होते. त्यांनी मला आज वेळ दिला, म्हणून त्यांची सदिच्छा भेट घेतली. मी दिल्लीला गेलो किंवा माझ्या दरे गावी गेलो तरी चर्चा होतेच. त्यामुळे चर्चा करणारे चर्चा करतच असतात. जेव्हा जेव्हा आम्ही मोदी साहेबांची भेट घेतो तेव्हा ते विकासावर बोलतात. मग ते महाराष्ट्राच्या विकासावर असो वा देशाच्या प्रगतीवर असो.

त्यामुळे त्यांना भेटल्यानंतर आम्हाला एक प्रकारची प्रेरणा मिळते. त्यांनी बाळासाहेबांच्या आठवणींना देखील उजाळा दिला. मोदींचे एनडीएबद्दल आणि महायुतीबद्दल मत स्पष्ट आहे असे शिंदे म्हणाले. शिंदे यांनी पंतप्रधान मोदींना शाल, पुष्पगुच्छ आणि संत तुकाराम महाराजांची मूर्ती भेट दिली. केंद्र आणि राज्यातील विविध विषयांवर दोघांमध्ये सकारात्मक चर्चा झाल्याचे शिंदे यांनी बैठकीनंतर सांगितले. राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) आणि महायुती म्हणजे एकच विचारधारा आणि विकासाचा अजेंडा घेऊन पुढे जाणारे एकत्र कुटुंब असल्याचे शिंदे यांनी सांगितले. शिवसेनेचे नेते रवींद्र धंगेकर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर सातत्याने आरोप करत आहेत. या संदर्भात शिंदे यांना विचारले असता, महायुतीत कुठेही मतभेद होऊ नयेत. महायुतीत बेबनाव होईल अशी कोणतीही कृती किंवा वक्तव्य टाळावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रत्येक कार्यकर्त्याला वाटते की स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक आपणही लढवावी, पण याबाबत महायुतीतील वरिष्ठ योग्य निर्णय घेतील आणि कार्यकर्त्यांना तो पाळावा लागेल. महायुतीमध्ये कुठेही मिठाचा खडा पडता कामा नये याची काळजी प्रत्येकाने घेतली पाहिजे. सत्ताधारी भाजप त्यांच्या मित्रपक्षांना संपवण्याच्या तयारीत आहे.

म्हणून उपमुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांच्या पक्षाला वाचवण्यासाठी दिल्लीला धाव घेतली आहे, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे. भाजपला त्यांचे मित्रपक्ष शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) यांना संपवून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवायच्या होत्या असा आरोप सपकाळ यांनी केला. ही योजना लक्षात येताच शिंदे यांनी आपल्या पक्षाच्या अस्तित्वासाठी दिल्लीला धाव घेतली. भाजप, शिंदेसेना आणि राष्ट्रवादीचे (अजित पवार) तथाकथित ट्रिपल-इंजिन सरकार अंतर्गत कलहाने भरलेले आहे. तिन्ही पक्षांमध्ये तीव्र वाद आहेत. त्यामुळे युतीच्या स्थिरतेबद्दल गंभीर शंका निर्माण झाल्या आहेत. भाजपने मुंबईत 'मिशन १५०' अंतर्गत त्यापेक्षा अधिक जागा लढवण्याची तयारी सुरू केली आहे. त्यामुळे शिंदे गट व अजित पवार गट बिथरणार यात शंका नाही. भाजपने जर दीडशे जागा लढवल्या तर २२७ जागांपैकी शिंदे आणि अजित पवार गटाच्या वाट्याला किती जागा येतील याबाबतचा हा राजकीय तिढा निर्माण झाला आहे. या जागावाटपाच्या मुद्यासाठीच शिंदे यांनी दिल्ली गाठली असावी अशी चर्चा आहे. गत काही दिवसांपासून राज्यात शिंदे गट व भाजपमध्ये शीतयुद्ध सुरू असल्याच्या चर्चे ने जोर धरला होता. शिंदे यांच्या कार्यकाळातील काही विकास प्रकल्पांना मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिली होती.

युतीतील समन्वय साधण्यासाठी आणि राज्यातील सद्यस्थितीबद्दल भाजपच्या केंद्रीय नेतृत्वासमोर आपले गा-हाणे मांडण्यासाठी शिंदे यांचा हा दिल्ली दौरा असावा, असे मानले जात आहे. उपमुख्यमंत्री शिंदे सातत्याने दिल्ली वा-या करत आहेत. पुन्हा मुख्यमंत्री होण्यासाठी ते आजही प्रयत्नशील असल्याचे बोलले जाते. मध्यंतरी देवेंद्र फडणवीस भाजपचे अध्यक्ष किंवा कॅबिनेट मंत्री म्हणून दिल्लीत जातील अशी चर्चा होती. परंतु त्या चर्चांना पूर्णविराम देताना, मी कुठेही जात नाही. मुख्यमंत्रिपदासाठी २०२९ पर्यंत तरी कोणतीही व्हॅकेन्सी नाही असा अप्रत्यक्ष संदेश एकनाथ शिंदे यांना दिला होता. कारण शिंदे सुद्धा आपल्या वर्तुळात 'मी पुन्हा येईन' असे सांगत होते म्हणे!

# तेलाचा खेळ!

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प कोलांटउड्यासाठी प्रसिद्ध आहेत. ते कधी काय बोलतील याचा नेम नसतो. नुकतीच त्यांनी एक लोणकढी थाप मारली. पुन्हा एक दावा करताना ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत रशियाकडून करत असलेली तेल खरेदी थांबवण्याचे आपल्याला आश्वासन दिले आहे. या दाव्यामुळे आंतरराष्ट्रीय ऊर्जा व्यापार आणि धोरणांमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता आहे. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्यामुळे मी समाधानी नव्हतो. त्यांनी (मोदींनी) मला आश्वासन दिले आहे की, ते रशियाकडून तेल खरेदी करणार नाहीत. ही एक मोठी गोष्ट आहे असे सांगून ट्रम्प म्हणाले, पंतप्रधान मोदींसोबत आपले 'उत्तम संबंध' आहेत. ट्रम्प पुढे म्हणाले, तेल खरेदी थांबेल. भारत आता तेल खरेदी करणार नाही. हा बदल लगेच होणार नसला तरी थोड्याच काळात होईल. रशियाकडून तेल खरेदी करत असल्याबद्दल अमेरिकेने भारतावर ५० टक्के शुल्क लादले आहे. जे सर्वाधिक शुल्कापैकी एक आहे. यात रशियन तेल खरेदीमुळे २५ टक्क्यांच्या अतिरिक्त शुल्काचा समावेश आहे. ट्रम्प यांचा हा दावा, एक आठवड्यापूर्वी त्यांचे व्यापार प्रतिनिधी जेमिसन ग्रीर यांनी केलेल्या दाव्यानंतर आला आहे. भारताने रशियन तेलापासून दूर राहावे असे ग्रीर म्हणाले होते. पत्रकारांशी बोलताना ट्रम्प म्हणाले, भारत रशियाकडून कच्चे तेल खरेदी करत असल्याबद्दल अमेरिका नाराज आहे. कारण अशा प्रकारच्या खरेदीमुळे युक्रेन युद्धात रशियाला आर्थिक मदत मिळाली. रशिया-युक्रेन युद्ध चार वर्षे सुरू असून या युद्धात दीड लाख नागरिकांचा मृत्यू झाला आहे. पंतप्रधान मोदी हे माझे चांगले मित्र आहेत. त्यांनी रशियाकडून तेल खरेदी करणार नसल्याचे आश्वासन मला दिले आहे. त्यामुळे रशियावर दबाव वाढवण्याच्या दृष्टीने हे मोठे पाऊल असून चीनलाही आम्ही हेच करायला लावणार आहोत. भारतासह अनेक देशांवर भरमसाठ आयात शुल्क आकारल्यानंतर भारत आणि पाकिस्तानसह जगभरातील आठ युद्धे थांबवल्याचा दावा करणारे डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भारताबद्दल नवा दावा केला आहे. रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी भारत थांबवणार असल्याचा शब्द आपल्याला दिल्याचा दावा ट्रम्प यांनी केल्याने खळबळ उडाली आहे. ट्रम्प यांच्या दाव्यानंतर परराष्ट्र मंत्रालयाने गुरुवारी स्पष्ट केले की मोदी व ट्रम्प यांच्यात बुधवारी कोणताही दूरध्वनी संवाद झालेला नाही. तेल व गॅसच्या किमती आणि त्यांचा सुरक्षित पुरवठा निश्चित करणे ही आमच्या ऊर्जा धोरणाची दोन महत्त्वाची उद्दिष्टे आहेत. यामध्ये आमच्या ऊर्जा स्रोतांचा विस्तार करणे आणि बाजारातील मागणी पूर्ण करण्यासाठी योग्य ती पावले उचलणे यांचा समावेश आहे, असे परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. अमेरिकेचा विचार केला तर, आम्ही अनेक वर्षांपासून आमची तेल आणि गॅस खरेदी वाढवण्याचा प्रयत्न करत आहोत. गेल्या दशकात यात सातत्याने प्रगती झाली आहे. सध्याच्या प्रशासनाने भारतासोबत ऊर्जा सहकार्य वाढवण्यात रस दाखवला आहे. यावर चर्चा सुरू आहे, असेही निवेदनात म्हटले आहे. युक्रेनमधील युद्धावरून रशियाला एकाकी पाडण्याच्या प्रयत्नातील हे एक मोठे पाऊल असून आता आम्ही चीनलाही हेच करायला लावणार आहोत, असेही ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमध्ये पत्रकारांना सांगितले. चीनसोबतच्या तणावाच्या काळात भारताला एक विश्वासू भागीदार म्हणून पाहता का, असे विचारले असता ट्रम्प म्हणाले, ऊर्जा धोरणावरून वाद असला तरी मोदी यांच्याशी माझे चांगले संबंध आहेत, ते माझे मित्र आहेत. ब्रिटिश पंतप्रधान भारत दौ-यावरून परतल्यानंतर रशियाकडून तेल खरेदी करणा-या भारतीय कंपन्यांवर निर्बंध लादण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. रशियाची आर्थिक ताकद कमी करणे, युक्रेन युद्धात रशियाला होणारे फंडिंग रोखणे हा या निर्णयाचा हेतू आहे, असे ब्रिटिश सरकारने सांगितले. रशिया आता जागतिक तेल बाजारपेठेतून हळूहळू बाहेर होत आहे. कुठलाही देश अथवा कंपनीने रशियाच्या तेल व्यापाराला मदत करू नये यासाठी ब्रिटन प्रयत्नशील आहे. आम्ही अशा सर्व कंपन्यांवर दबाव निर्माण करू जे रशियाला मदत करतात. मग तो भारत असेल वा चीन. रशियाच्या तेलासाठी आता जागतिक बाजारपेठेत जागा नाही, असे ब्रिटनने म्हटले आहे. भारताची 'नयारा एनर्जी' एक प्रमुख खासगी रिफायनरी कंपनी आहे. या कंपनीने गत वर्षी रशियाकडून 'रेकॉर्ड ब्रेक' तेल खरेदी केले होते. नयारा एनर्जीने १०० दशलक्ष बॅरल कच्चे तेल रशियाकडून खरेदी केले होते. ज्याची किंमत सुमारे ४१ हजार कोटी रुपये आहे. भारत आणि चीनच्या काही कंपन्या रशियाकडून तेल खरेदी करून त्यांची अर्थव्यवस्था मजबूत करीत आहेत. त्यावर ब्रिटनने नाराजी व्यक्त केली. ही खरेदी रशियाला युक्रेनसोबतच्या युद्धात आर्थिक ताकद देते, असा ब्रिटनचा आरोप आहे. पंतप्रधान मोदी हे डोनाल्ड ट्रम्प यांना घाबरतात, अशी खोचक टीका लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे. मोदी यांनी रशियाकडून तेल खरेदी करणे बंद करणार असल्याचा शब्द दिला असल्याचा दावा ट्रम्प यांनी नुकताच केला. या दाव्यानंतर राहुल गांधी यांनी मोदींना लक्ष्य केले. ते म्हणाले, टॅरिफ वाढ आणि भारत-पाक सशस्त्र संघर्षात मध्यस्थी केल्याचा दावा ट्रम्प यांनी वारंवार केल्यानंतरही मोदी सोशल मीडियावर त्यांचे अभिनंदन करत राहिले. भारत रशियन तेल खरेदी करणार की नाही, हे ठरविण्याची आणि जाहीर करण्याची ट्रम्प यांना परवानगी देणे, ट्रम्प वारंवार अवहेलना करत असूनही त्यांना अभिनंदनाचे संदेश पाठवणे, अर्थमंत्र्यांचा अमेरिकेचा दौरा रद्द करणे, ईजिप्तमधील शर्म-अल-शेखची बैठक टाळणे आणि 'ऑपरेशन सिंदूर'बाबत ट्रम्प यांनी केलेल्या दाव्याचे खंडन न करणे यावरून मोदी ट्रम्प यांना घाबरतात हे सिद्ध होते, असे राहुल गांधी म्हणाले. भारत आणि रशियाचे संबंध विश्वासाच्या भक्कम पायावर उभे असून रशियन तेल भारताच्या अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचे आहे असे रशियाने म्हटले आहे. एकूण काय, तेलाचा सारा खेळ सुरू आहे, असेच म्हणावे लागेल!


**printed by SHIVAJI BABAN KHEDKAR, and published by SHIVAJI BABAN KHEDKAR, Owner by SHIVAJI BABAN KHEDKAR on behalf of Marathi Magazine SWARAJ DUNIYA, printed at M/s. Shree Samarth Printers, Appa Balwant Chowk, Near Prabhat Theatre, 535, Shanivar Peth, Pune - 411030 (Maharashtra) and published at Property No. 2585, Gat No. 1026, Old Bhambarde Road, Ranjangaon Ganpati, Tal. Shirur, Dist. Pune - 412209 (Maharashtra) Editor - SHIVAJI BABAN KHEDKAR**

**मुद्रक शिवाजी बबन खेडकर आणि प्रकाशक शिवाजी बबन खेडकर मालक शिवाजी बबन खेडकर यांचे नावे मराठी मासिक स्वराज दुनिया, श्री समर्थ प्रिंटर्स, अप्पा बळवंत चौक, प्रभात थेअटरच्या जवळ, ५३५, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० (महाराष्ट्र). द्वारे मुद्रित करुन आणि प्रकाशन ठिकाण : प्रॉपर्टी नं. २५८५, गट नं. १०२६, जुना भांबर्डे रोड, रांजणगाव गणपती, ता. शिरूर, जि. पुणे – ४१२२०९ (महाराष्ट्र).**

**संपादक : शिवाजी बबन खेडकर**

# इंद्रायणी नदी लवकरच मोकळा श्वास घेणार

■ **५२६ कोटींचा 'इंद्रायणी' सरोवर पुनरुज्जीवन प्रकल्प**

**पिंपरी :** तीर्थक्षेत्र देहू आणि आळंदीमधून वाहणारी आणि वारकरी संप्रदायाचे श्रद्धेचे स्थान असलेली इंद्रायणी नदी लवकरच मोकळा श्वास घेणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या 'इंद्रायणी' सरोवर पुनरुज्जीवन प्रकल्पास राज्य शासनाने सोमवारी प्रशासकीय मान्यता दिली. ५२६ कोटी रुपयांचा हा प्रकल्प दोन वर्षांत पूर्ण केला जाणार आहे.

मावळ तालुक्यातील कुरवंडे गावातून इंद्रायणी नदी उगम पावते. पुढे ती तीर्थक्षेत्र देहूगाव, आळंदी मार्गे तुळापूर येथे जाऊन भीमा नदीला मिळते. भीमा नदी पुढे मुळा-मुठा नदीला घेऊन उजनी धरण मार्गे पंढरपूरला जाते. पिंपरी-चिंचवड शहरातून १८.८० किलोमीटर नदीचे पात्र आहे. नदी शहरात येताच अनेक गटारी, नाले नदीत थेट मिसळतात. त्यामुळे नदीचा रंग बदलू लागतो. निर्मळ पाण्याला नाल्याचे रूप येते. इंद्रायणीत जलपर्णी दिसते. कुदळवाडी नाल्यातून औद्योगिक कंपन्यांमधील रसायनमिश्रित पाणी नदीत मिसळते. त्यामुळे महापालिकेने 'इंद्रायणी' सरोवर पुनरुज्जीवन प्रकल्प आखला. त्याला राज्यस्तरीय तांत्रिक समितीने सप्टेंबर महिन्यात मान्यता दिली. आता प्रशासकीय मान्यता मिळाल्याने महापालिका हद्दीतील नदीपात्राचे पुनरुज्जीवन करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**पाणी साठवण्यासाठी जलनिस्सारण प्रणाली**

या प्रकल्पातून नदीसंवर्धन, पूरनियंत्रण, पाण्यावर प्रक्रिया आणि सुशोभीकरण अशा चारही बाबी साध्य केल्या जाणार आहेत. पावसाचे पाणी साठवण्यासाठी जलनिस्सारण प्रणाली, प्रदूषित पाणी सांडपाणी प्रकल्पाकडे वळविण्यासाठी 'इंटरसेप्टर', पूर नियंत्रणासाठी दगडी बांधकाम, नदीच्या काठांचे सक्षमीकरण, नदीपात्राचे तटबंदीकरण, नदी तटावर हरित क्षेत्राचा विकास, वनसंवर्धनाद्वारे सुशोभीकरण अशी कामे एकत्रितपणे करण्यात येणार आहेत. चिखलीतील रिव्हर रेसिडेन्सी आणि स्मशानभूमीजवळ ४० आणि २० दशलक्ष लीटर (एमएलडी) क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारले जाणार आहेत.

**महापालिकेचा ५० टक्के हिस्सा**

'इंद्रायणी' सरोवर पुनरुज्जीवन प्रकल्पास राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यामुळे लवकरच निविदा प्रक्रिया राबविली जाईल. महापालिका हद्दीतून वाहणाऱ्या १८.८० किलोमीटर नदी पात्राचे पुनरुज्जीवन केले जाईल, असे महापालिकेचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी सांगितले.

इंद्रायणी नदी केवळ धार्मिक श्रद्धेचा विषय नसून संस्कृती, पर्यावरण आणि शहराच्या आरोग्याशी थेट जोडलेली जीवनवाहिनी आहे. या प्रकल्पाद्वारे इंद्रायणी नदीला नवजीवन मिळेल, प्रदूषणमुक्त व सुरक्षित किनारे तयार होतील. नागरिकांना हरित व सुंदर नदीकाठाचा अनुभव मिळेल, असे आमदार महेश लांडगे म्हणाले.

# महापालिका निवडणुकीसाठी प्रभागनिहाय आरक्षण सोडत १९ नोव्हेंबरला

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रभागनिहाय आरक्षण निश्चितीसाठी राज्य निवडणूक आयोगाने मार्गदर्शक सूचना जारी केल्यानंतर आता आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. आरक्षण सोडतीची माहिती ११ नोव्हेंबरला आयोगाला सादर करावी लागणार आहे.

महापालिकेची निवडणूक चार सदस्यीय पद्धतीने होणार असून ३२ प्रभागांतून १२८ नगरसेवक निवडले जाणार आहेत. महापालिका निवडणुकीसाठी सहा ऑक्टोबरला अंतिम प्रभागरचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये सहा प्रभागांत बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे आरक्षणात बदल होतील. आरक्षण निश्चितीसाठी राज्य निवडणूक आयोगाने मार्गदर्शक अध्यादेश जारी केला आहे. त्यानंतर आता आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे.

आरक्षित जागांची संख्या निश्चित करून ४ नोव्हेंबरपर्यंत त्यास आयोगाची मान्यता घ्यावी लागणार आहे. आरक्षण सोडतीची जाहीर सूचना आठ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. आरक्षण काढून सोडतीचा निकाल आयोगाच्या मान्यतेसाठी ११ नोव्हेंबर रोजी सादर करावा लागणार आहे. प्रभागातील अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), इतर मागासवर्ग (ओबीसी) तसेच खुल्या गटातील या सर्व राखीव जागांवर महिलांसाठी असलेल्या जागेचे चित्र कसे असेल, याकडे इच्छुकांचे लक्ष लागले आहे.

**अशी असेल प्रक्रिया**

- **आरक्षित जागांची संख्या निश्चित करून चार नोव्हेंबरपर्यंत आयोगाची मान्यता घेणे**
- **आरक्षण सोडतीची जाहीर सूचना आठ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध करणे**
- **आरक्षण सोडत काढून सोडतीचा निकाल ११ नोव्हेंबर रोजी आयोगाच्या मान्यतेसाठी सादर करणे**
- **प्रारूप आरक्षण सोडतीवर २४ नोव्हेंबरपर्यंत हरकती, सूचना स्वीकारणार**
- **हरकती, सूचनांवर आयुक्तांनी १ डिसेंबरपर्यंत निर्णय घेणे**
- **आयोगाच्या मान्यतेनंतर अंतिम आरक्षणाची अधिसूचना २ डिसेंबर रोजी शासन राजपत्रात प्रसिद्ध केली जाईल.**

**आरक्षणानंतर चित्र स्पष्ट होणार**

'एससी'च्या २०, 'एसटी'च्या तीन, 'ओबीसी'साठी ३५ जागांवर आणि खुल्या गटातील ३५ जागांवर महिलांचे आरक्षण पडण्याची शक्यता आहे. प्रभागातील अ, ब, क आणि ड या जागा कोणाला सुटणार, एकूण १२८ पैकी महिलांसाठी कोणत्या प्रभागातील जागा असतील, याबाबत इच्छुकांसह माजी नगरसेवक व पदाधिकाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# कृषी यांत्रिकीकरणातून शेतकऱ्यांना आधुनिक यंत्रसामग्रीचा लाभ देण्यासाठी शासन कटिबद्ध

**सोलापूर -** कृषी यांत्रिकीकरण व विविध योजनांच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आज एक ऐतिहासिक लाभ मिळाला. एकूण १००० अनुदानित ट्रॅक्टरचे वितरण करण्यात आले असून केगाव (उत्तर सोलापूर) येथे आयोजित कार्यक्रमात १०१ नवीन ट्रॅक्टर कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते शेतकऱ्यांना प्रदान करण्यात आले.

या वितरणात अक्कलकोट, दक्षिण सोलापूर व उत्तर सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्यांचा समावेश होता. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा कृषी अधीक्षक शुक्राचार्य भोसले, तालुका कृषी अधिकारी, कृषी विभागाचे कर्मचारी तसेच ट्रॅक्टर



कंपनीचे वितरक उपस्थित होते. श्री. भरणे यांनी फीत कापून कार्यक्रमाचा शुभारंभ केला आणि शेतकऱ्यांना ट्रॅक्टरच्या चाव्या सुपूर्द केल्या.

कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत २०२५-२६ या वर्षासाठी मंजूर निधीच्या आधारे 'प्रथम अर्ज, प्रथम प्राधान्य' या तत्त्वानुसार १,९६,०५० लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. यापैकी १,८९,७५३ अर्ज प्रक्रियेत असून ८,२५१ अर्जांना पूर्वसंमती देण्यात आली आहे. तसेच ५५६ लाभार्थ्यांच्या बँक खात्यात ७११.०० लाख रुपयांचे अनुदान थेट वर्ग करण्यात आले आहे.

## चांदसैली घाटातील दुर्घटना अत्यंत वेदनादायी

**नंदुरबार :** चांदसैली घाटात झालेल्या भीषण अपघातानंतर आज राज्याचे क्रिडा व युवक कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी नंदुरबार जिल्हा रुग्णालयात दाखल जखमींची भेट देऊन त्यांची विचारपूस केली. या वेळी त्यांनी जखमींना सर्वतोपरी उपचार मिळावेत यासाठी अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्यातील चांदसैली घाटात पिकअप गाडी पलटी होऊन झालेल्या अपघातात अनेकजण जखमी झाले असून काहींचा मृत्यू झाला आहे. या दुर्दैवी घटनेबद्दल पालकमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी तीव्र दु:ख व्यक्त करत मृत्युमुखी पडलेल्या माता-भगिनींप्रती संवेदना प्रकट केल्या. अपघातानंतर पालकमंत्री कोकाटे यांनी आज सकाळी जिल्हा सामान्य रुग्णालयात भेट देऊन जखमी नागरिकांची प्रकृती जाणून घेतली. रुग्णालयातील डॉक्टर व अधिकाऱ्यांशी संवाद साधून त्यांनी सर्व जखमींना आवश्यक औषधे, रक्तपुरवठा आणि तातडीचे उपचार त्वरित उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या. आमदार राजेश पाडवी, आमदार आमशा पाडवी सामान्य रुग्णालयातील अधिकारी, आरोग्यकर्मी, रूग्णांचे नातेवाईक व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. या वेळी पालकमंत्री म्हणाले, ही दुर्घटना अत्यंत वेदनादायी आहे. जखमींना सर्वोत्तम उपचार मिळावेत, त्यांच्या कुटुंबीयांना आवश्यक मदत मिळावी, यासाठी शासन-प्रशासनाशी सातत्याने संपर्कात असून या कठीण प्रसंगात राज्य शासन त्यांच्या सोबत ठामपणे उभं आहे.

# बीडकरांची दिवाळी नवीन घरकुलात घरकुल बांधणीत बीड जिल्ह्याने रचला नवा विक्रम!

**बीड :** 'दिवाळी नवीन घरकुलात' या उपक्रमांतर्गत बीड जिल्ह्याने राज्यात विक्रमी कामगिरी केली आहे. प्रधानमंत्री आवास योजना (पीएमएवाय) तसेच राज्य पुरस्कृत घरकुल योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यातील ५० हजारांहून अधिक घरकुले विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आली असून, या निमित्ताने बीडकरांचे हक्काच्या घरात राहण्याचे स्वप्न साकार झाले आहे. या कामासाठी सरकारमार्फत ९९० कोटींचा निधी वितरित करण्यात आला आहे. या कामगिरीमुळे बीड जिल्ह्याने संपूर्ण राज्यात प्रथम क्रमांक मिळवत नवा विक्रम रचला आहे. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, यंत्रणेतील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांसह लाभार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले की, ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला हक्काचे घर मिळावे, हीच या उपक्रमामागची प्रेरणा आहे. बीड जिल्ह्यातील हजारो कुटुंबांनी यंदाची दिवाळी आपल्या नव्या घरकुलात साजरी केली, हीच या योजनेची खरी यशोगाथा आहे. प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी दाखविलेली समर्पणभावना, नियोजन आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा हेच या योजनेच्या यशस्वीतेचे रहस्य आहे. काटेकोर नियोजन, दैनंदिन देखरेख आणि टीमवर्कचा हा विजय आहे. या उपक्रमासाठी जिल्हा प्रशासनाने विकसीत केलेल्या 'पीएमएवाय (सॉफ्ट) प'चा मोठा वाटा आहे. या पद्धतीने प्रत्येक अधिकाऱ्याला विशिष्ट प्रभागाची जबाबदारी देण्यात आली होती. लाभार्थ्यांशी सतत संपर्क ठेवून बांधकाम सुरू ठेवण्यास त्यांना प्रोत्साहित करण्यात आले.

# पोलिसांची कर्तव्यनिष्ठा, शौर्य आणि बलिदानाला सलाम

**नंदुरबार :** कर्तव्यनिष्ठा, शौर्य आणि बलिदानाला नमन करण्यासाठी आपण आज एकत्र आलो आहोत, देशाच्या सीमा आणि समाजाच्या सुरक्षेसाठी आपले प्राण अर्पण करणाऱ्या प्रत्येक जवानाला हा दिवस अभिवादनाचा आहे, अशा शब्दात पालकमंत्री ड. माणिकराव कोकाटे यांनी पोलीस स्मृती दिनानिमित्त शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण केली.

ते आज जिल्हा पोलीस मुख्यालयात आयोजित पोलीस स्मृती दिन समारंभात बोलत होते. या प्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस., अप्पर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, अप्पर पोलीस अधीक्षक अशीत कांबळे, उपविभागीय पोलीस अधिकारी संजय महाजन तहसीलदार प्रमोद पवार, पोलीस अधिकारी, कर्मचारी व शहीद जवानांचे नातेवाईक उपस्थित होते.

पालकमंत्री ड. कोकाटे म्हणाले, या पवित्र दिनामागील इतिहास अतिशय प्रेरणादायी आहे. २१ ऑक्टोबर १९५९ रोजी लडाखमधील 'हॉट स्प्रिंग्स' या थंड बर्फाळ प्रदेशात भारताच्या सीमा रक्षक दलाच्या दहा जवानांवर चिनी सैन्याने हल्ला केला. आपल्या प्राणाची पर्वा न करता त्यांनी शत्रूशी झुंज दिली आणि देशासाठी बलिदान दिले. त्या तेजस्वी क्षणाची आठवण म्हणून २१ ऑक्टोबर हा दिवस देशभर 'पोलीस स्मृती दिन' म्हणून साजरा केला जातो.

## सातारा जिल्ह्यातील 'साखरवाडी' आणि पुणे जिल्ह्यातील 'कुंजीरवाडी' गावांना जैवविविधता संवर्धनासाठी केंद्र सरकारकडून निधी


**नवी दिल्ली :** भारताच्या समृद्ध जैविक वारशाचे संरक्षण आणि स्थानिक समुदायांना त्यांच्या योगदानाचे फायदे मिळवून देण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरणाने महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशातील जैवविविधता संवर्धनासाठी १ कोटी ३६ लाख रुपयांचा निधी जारी केला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यातील साखरवाडी आणि पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील कुंजीरवाडी या गावांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. या गावांना प्रत्येकी ४५.५० लाख रुपयांचा निधी प्राप्त होणार आहे.

राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरणाने हा निधी महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशातील राज्य जैवविविधता मंडळांमार्फत वितरित करण्याचा निर्णय घेतला आहे. याअंतर्गत साखरवाडी (सातारा), कुंजीरवाडी (पुणे) आणि उत्तर प्रदेशातील एटा जिल्ह्यातील कासगंज परिसरातील जैवविविधता व्यवस्थापन समित्यांना निधी प्राप्त होणार आहे. हा निधी जैवविविधता कायदा २००२ च्या कलम ४४ आणि संबंधित राज्य जैवविविधता नियमांनुसार वाटप करण्यात येत आहे.

# संरक्षण व एरोस्पेस उत्पादनाचे प्रमुख केंद्र म्हणून नागपूरची आता नवी ओळख - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ **सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस प्रकल्पास मिहानमधील २२३ एकर भूखंडाचे हस्तांतरण**

नागपूर, दि. २३ : सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस ही भारतातील अग्रगण्य उत्पादक कंपनी नागपूर येथे विस्तार करीत आहे. या अत्याधुनिक संरक्षण व एरोस्पेस उत्पादन प्रकल्पासाठी अटी व शर्तीनुसार मिहानतर्फे २२३ एकर जागेचे हस्तांतरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.



रामगिरी निवासस्थानी आयोजित कार्यक्रमात मिहान प्रकल्पातील वैशिष्ट्यपूर्ण ठरणाऱ्या या प्रकल्पासाठी जमिनीचे हस्तांतरण मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते सोलार कंपनीचे अध्यक्ष सत्यनारायण नुवाल यांना करण्यात आले. याप्रसंगी सोलार ग्रुपचे संचालक मनीष नुवाल, राघव नुवाल, सोलारचे वरिष्ठ अधिकारी जे.एफ साळवे, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे सह व्यवस्थापकीय संचालक तथा जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, वरिष्ठ व्यवस्थापक गौरव उपश्याम, संजय इंगळे आदी उपस्थित होते.

सोलर डिफेन्स अँड एरोस्पेसच्या या नव्या विस्तारित प्रकल्पामुळे नागपूरला देशातील प्रमुख संरक्षण व एरोस्पेस उत्पादन केंद्र म्हणून नवी ओळख प्राप्त होणार असल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाधान व्यक्त केले. हा उपक्रम महाराष्ट्राच्या 'मेक इन इंडिया', 'आत्मनिर्भर भारत' आणि औद्योगिक प्रगतीच्या विकासासाठी अधिक बळकटी देणारा असल्याचे ते म्हणाले. महाराष्ट्राच्या विकासासाठी शासनाने घेतलेल्या गुंतवणूकदार-अनुकूल धोरणांचा व अग्रगण्य उद्योगांचा वाढता विश्वास यावरून अधोरेखित होत असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस कंपनी भारतात संरक्षण क्षेत्रात सुमारे १२ हजार ८० कोटींची गुंतवणूक करत आहे. नागपूर येथे यातील ६८० कोटी रुपयांची गुंतवणूक करून हा प्रकल्प मिहान मधील विशेष आर्थिक क्षेत्रात साकारला जात आहे. या प्रकल्पामुळे सुमारे ४०० प्रत्यक्ष रोजगार निर्मिती व सुमारे एक हजार अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल.

# पिंपरी-चिंचवडमध्ये पावणेनऊ वर्षांत पाच लाख मतदार वाढले

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवडणूक फेब्रुवारी २०१७ नंतर आता जानेवारी महिन्यात होण्याची शक्यता आहे. सन २०१७ मध्ये शहराची मतदारसंख्या ११ लाख ९२ हजार ८९ इतकी होती. आता सुमारे पावणेनऊ वर्षांनंतर महापालिका निवडणूक होत असून, या कालावधीत शहराची मतदारसंख्या पाच लाखांनी वाढली आहे. आगामी महापालिका निवडणुकीत १७ लाख १३ हजार ८९१ मतदार मतदानाचा हक्क बजाविणार आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिकेची आगामी निवडणूक सन २०११ च्या जनगणनेनुसार होत आहे. २०११ मध्ये शहराची लोकसंख्या १७ लाख २७ हजार ६९२ इतकी होती. आता लोकसंख्या ३० लाखांच्या पुढे गेल्याचा अंदाज आहे. फेब्रुवारी २०१७ ला झालेल्या महापालिका निवडणुकीत सन २०११ ची लोकसंख्या ग्राह्य धरण्यात आली होती.



आगामी निवडणुकीसाठीही सन २०११ च्या जनगणनेनुसारच्या लोकसंख्येप्रमाणेच प्रभागरचना करण्यात आली आहे. सध्याची शहराची एकूण मतदारसंख्या १७ लाख १३ हजार ८९१ इतकी आहे. गेल्या पावणेनऊ वर्षांत शहरात पाच लाख २१ हजार ८०२ मतदारसंख्या वाढली आहे.

आगामी महापालिका निवडणुकीसाठी एक जुलै २०२५ पर्यंतची मतदारयादी ग्राह्य धरण्यात येणार आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक सहा लाख ७६ हजार ६३८ इतके मतदार आहेत. त्यात तीन लाख ५४ हजार ७६८ पुरुष आणि तीन लाख २१ हजार ८१२ महिला व ५८ तृतीयपंथी मतदार आहेत. भोसरी विधानसभा मतदारसंघात एकूण सहा लाख २४ हजार १५२ मतदार आहेत. त्यात पुरुष तीन लाख ३५ हजार ७५७, महिला दोन लाख ८८ हजार २९४ व तृतीयपंथी १०१ मतदार आहेत.

पिंपरी विधानसभेत तीन लाख ९९ हजार ८११ मतदार आहेत. त्यात दोन लाख सात हजार ७७५ पुरुष, एक लाख ९१ हजार ९९८ महिला आणि ३८ इतर मतदार आहेत. भोर विधानसभा मतदारसंघात असलेल्या ताथवडे परिसरात १३ हजार २९० मतदार आहेत.

महापालिकेच्या निवडणूक विभागाकडून प्रभागनिहाय मतदारयादी विभागणीचे काम सुरू आहे. नोव्हेंबरमध्ये प्रभागानुसार आरक्षणांची सोडत होणार आहे. एका प्रभागात ४५ ते ५५ हजार इतकी मतदार संख्या असणार आहे.

# भाजपच्या युवा पदाधिकाऱ्यावर गुन्हा

■ **पक्षाच्याच महिला पदाधिकाऱ्याची तक्रार**

**पिंपरी** : भारतीय जनता पक्षाच्या युवा आघाडीच्या पदाधिकाऱ्याच्या नावाने पक्षाच्याच महिला पदाधिकाऱ्याला जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार पोलिसांत दाखल झाली आहे. ही घटना चिंचवड येथे घडली. याप्रकरणी पदाधिकाऱ्यासह सात जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात दोन महिलांचाही समावेश आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला २६ ऑक्टोबर रोजी दुपारी दोनच्या सुमारास त्यांच्या ओळखीतील एका व्यक्तीला भेटण्यासाठी चिंचवड येथे गेल्या होत्या. दरम्यान, बंगल्याबाहेर संशयितांनी आमचा दादा येथे असताना तू येथे का आलीस, असे विचारून धमकी दिली. फिर्यादी महिला पुन्हा बंगल्यात परत गेली. एक व्यक्ती मोटार घेऊन फिर्यादी महिलेला सोडायला आली असता, काही महिलांनी फिर्यादी महिलेच्या मोटारीला घेराव घातला. फिर्यादी महिला तक्रार देण्यासाठी चिंचवड पोलीस ठाण्यात गेली असता दोन महिलांनी त्यांना मारहाण आणि शिवीगाळ केली. पोलीस उपनिरीक्षक सुजाता पाटील तपास करत आहेत.

# पिंपरी महापालिकेतील उपायुक्तांच्या कामकाजात फेरबदल

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी तीन उपायुक्तांच्या विभागामध्ये फेरबदल केला आहे. आगामी महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला निवडणूक विभाग उपायुक्त सचिन पवार यांच्याकडे सोपविला आहे. डॉ. प्रदीप ठेंगल यांच्याकडे आरोग्य विभागाची जबाबदारी दिली आहे.

आगामी महापालिका निवडणुकीची प्रक्रिया सुरू असतानाच महापालिकेच्या निवडणूक आणि करआकारणी व करसंकलन विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांची आठ दिवसांपूर्वी पदोन्नतीने नागपूर येथे बदली झाली. त्यांच्याकडील दोन्ही विभागांचा पदभार कोणाकडे दिला नव्हता. शिंदे यांनाही कार्यमुक्त केले नव्हते. परंतु, शिंदे यांनी कार्यमुक्त करण्याची मागणी केली. त्यानुसार सोमवारी शिंदे यांना महापालिका सेवेतून कार्यमुक्त करण्यात आले. त्यानंतर आयुक्त हर्डीकर यांनी तीन उपायुक्तांच्या विभागांमध्ये बदल केला.

त्यानुसार उपायुक्त सचिन पवार यांच्याकडून आरोग्य विभागाचा पदभार काढून त्यांच्याकडे निवडणूक आणि जनगणना विभाग सोपविला आहे. नागरी सुविधा केंद्राचे उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्याकडे आरोग्य व स्वच्छ भारत अभियानाचा अतिरिक्त पदभार दिला आहे. क्रीडा विभागाचे उपायुक्त पंकज पाटील यांच्याकडे करआकारणी व करसंकलन विभागाची अतिरिक्त जबाबदारी सोपविली आहे.

# तीव्र चक्रीवादळात रूपांतरित! हवामान विभागाचा अनेक जिल्ह्यांना सतर्कतेचा इशारा

**पुणे** : बंगालच्या उपसागरातील कमी दाब क्षेत्राचे चक्रीवादळात रुपांतर झाले असून या चक्रीवादळाला थायलंडने सुचवलेले 'मोंथा' हे नाव देण्यात आले आहे. पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरावर असणारे हे चक्रीवादळ मोंथा गेल्या सहा तासांत ताशी १५ किलोमीटर वेगाने उत्तर-उत्तरपश्चिमेकडे सरकले आहे आणि मंगळवारी पहाटे ५.३० वाजता या चक्रीवादळाचे रूपांतर तीव्र चक्रीवादळात झाले आहे, अशी माहिती हवामान विभागाने दिली आहे

तसेच ही हवामान प्रणाली पहाटे ५.३० वाजता मछलीपट्टणमच्या १९० किमी दक्षिण ते आग्नेयेला, काकीनाडाच्या २७० किमी दक्षिण ते आग्नेयेला आणि विझागच्या ३४० किमी दक्षिण-आग्नेयेला केंद्रित होती, अशी माहिती देखील हवामान विभागाने दिली आहे.

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी सोमवारी मोंथा चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर ज्या भागात पाऊस आणि पुराची शक्यता आहे अशा भागात अधिकाऱ्यांना खबरदारीच्या उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील मुख्यमंत्री नायडू यांच्याशी फोनवरून चर्चा केली आणि चक्रिवादळाबद्दल माहिती घेतली.

**हवामान विभागाचा रेड अलर्ट**

भारतीय हवामान विभागाने सोमवारी आंध्र प्रदेशातील किनारपट्टीवरील काकीनाडा, कोनसीमा, पश्चिम गोदावरी, कृष्णा, बापटला, प्रकाशम आणि एसपीएसआर नेल्लोर या जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे.

उत्तर तमिळनाडूतील तिरुवल्लूर जिल्ह्यासह ओडिशातील दक्षिणेकडील मालकानगिरी, कोरापुत, कालाहांडी, गजपती, नबरंगपूर, बालांगीर, कंधमल आणि गंजम या जिल्ह्यांमध्येही मुसळधार पाऊस अपेक्षित असून, या भागांसाठी सोमवारी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

चक्रीवादळ मोंथा जमिनीकडे वळाल्याने सोमवारी आंध्र प्रदेशच्या किनारी पट्ट्यात मुसळधार पाऊस आणि जोरदार वारे पाहायला मिळाले. यामुळे संपूर्ण प्रदेशात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. चक्रीवादळ मोंथाच्या पार्श्वभूमीवर आणि प्रवाशांची सुरक्षिततेसाठी, दक्षिण मध्य रेल्वेने सोमवारी एक बुलेटिन जारी केले आहे, ज्यामध्ये अनेक रेल्वे सेवा अंशतः रद्द करणे, त्यांचे वेळापत्रक बदलणे आणि काही सेवा पूर्ववत करण्याची घोषणा करण्यात आली आहे. प्रवाशांना प्रवास करण्यापूर्वी त्यांच्या रेल्वे गाडीचे स्टेटस तपासून बघण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

# इंदापूर तालुक्यातील बाबीर देव यात्रा उत्साहात

**इंदापूर** : इंदापूर तालुक्यातील रुई येथील श्री बाबीर देवाची पारंपरिक यात्रा यंदा उत्साहात झाली. राज्यासह कर्नाटकातून आलेल्या भाविकांच्या उपस्थितीत तीन दिवस ही यात्रा रंगली. हजारो भाविकांनी श्रद्धेने बाबीर देवाचे दर्शन घेतले. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, सोनाई उद्योग समूहाचे प्रमुख दशरथ माने, माजी आमदार यशवंत माने यांनीही यात्रेला उपस्थित राहून दर्शन घेतले. रुईची बाबीर देव यात्रा ही राज्यातील मोठ्या यात्रांपैकी एक मानली जाते. धार्मिकतेसोबतच सांस्कृतिक परंपरेचा संगम घडवणारी ही यात्रा वर्षानुवर्षे भाविकांना आकर्षित करत आहे. यावर्षीही तीन दिवस गाव परिसरात उत्साह होता.

## दिवाळीत ६८ ठिकाणी आगीच्या घटना

**पुणे** : दिवाळीत शहराच्या वेगवेगळ्या भागांत ६८ ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या. सुदैवाने या घटनेत जीवितहानी झाली नाही. बहुतांश ठिकाणी आतषबाजीमुळे आग लागल्याची माहिती अग्निशमन दलाकडून देण्यात आली.

दिवाळीत (नरक चतुर्दशी ते भाऊबीज) शहरातील वेगवेगळ्या भागांत आग लागण्याच्या घटना घडल्या. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सायंकाळनंतर आग लागण्याच्या सर्वाधिक घटना घडल्या. बहुतांश ठिकाणी लागलेल्या आगी किरकोळ स्वरूपाच्या होत्या.

# बिबट्याच्या हल्ल्यात ज्येष्ठ महिलेच्या मृत्यू

**शिरूर** : शिरूरमधील जांबूत येथे बिबट्याच्या हल्ल्यात ज्येष्ठ महिलेचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडली. त्यामुळे या परिसरात घबराट पसरली आहे. भागुबाई रंगनाथ जाधव (वय ७२) असे मृत्युमुखी पडलेल्या ज्येष्ठ महिलेचे नाव आहे. शिरूर तालुक्यात आतापर्यंत दहा जणांचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास जांबुतमधील थोरातवस्ती येथे राहणाऱ्या भागुबाई या लघुशंकेसाठी घराबाहेर पडल्या असताना बिबट्याने हल्ला करून त्यांना उसाच्या शेतात ओढून नेले. त्या घरात न आल्याने त्यांच्या मुलाने शोध घेतला असता, त्यांचा मृतदेह घरापासून पाचशे मीटर अंतरावर सापडला.

'जांबुत येथे बिबट्याला पकडण्यासाठी १४ पिंजरे लावण्यात आले आहेत. पिंपरखेड परिसरात मागील आठ दिवसांत ३ बिबटे आणि टाकळी हाजी येथे एक असे चार बिबटे जेरबंद करण्यात आले आहेत,' असे तालुका वनाधिकारी नीलकंठ गव्हाणे यांनी सांगितले. दरम्यान, १२ ऑक्टोबर रोजी पिंपरखेड येथे बिबट्याने केलेल्या हल्ल्यात शिवन्या शैलेश बोंबे या साडेपाच वर्षांच्या बालिकेचे निधन झाले. त्यानंतर आता ज्येष्ठ महिलेच्या मृत्यूमुळे या परिसरात घबराट पसरली आहे. यापूर्वी पिंपरखेड, जांबुतमधील समृद्ध सचिन जोरी, पूजा भगवान नरवडे, पूजा जालिंदर जाधव, मुक्ताबाई भाऊ खाडे, इनामगाव येथील लक्ष्मीबाई बबन भोईटे, टेंभेकर वस्ती येथील शिवतेज टेंभेकर, वश सिंग आणि रक्षा निकम यांना बिबट्यांच्या हल्ल्यात प्राण गमवावा लागला आहे.

शिरूर तालुक्यातील पिंपरखेड, जांबुत, टाकळी हाजी; तसेच मांडवगण फराटा, इनामगाव या परिसरात बिबट्यांनी हल्ले केल्याच्या घटना घडल्या आहेत. जुन्नर, आंबेगाव आणि खेड या तालुक्यांमध्ये बिबट्यांचा वावर असतो. मात्र, मागील काही वर्षांपासून शिरूर तालुक्यातही बिबटे आढळून येत आहेत.

# पुणेकरांनी दिवाळीत निर्माण केला इतका टन अतिरिक्त कचरा !

**पुणे** : दिवाळीच्या पाच दिवसांमध्ये शहरात अतिरिक्त तयार झालेल्या ७५० टन कचऱ्याची विल्हेवाट महापालिकेने लावली. नरक चतुर्दशी ते भाऊबीज (२० ते २४ ऑक्टोबर) या काळात प्रत्येक दिवशी सर्वसाधारण १५० टन अतिरिक्त कचरा तयार झाला. यामध्ये फटाके, भेटवस्तूंचे कागद यासह दिवाळीच्यानिमित्त बाहेर काढण्यात आलेल्या जुन्या वस्तूंचा कचरा याचा समावेश होता.

शहरात दररोज सर्वसाधारण २५०० ते २६०० टन कचरा तयार होतो. दिवाळीच्या काळात यामध्ये वाढ होऊन हे प्रमाण २९०० टनांच्या घरात गेल्याचे महापालिकेच्या घनकचरा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले. दिवाळीमध्ये तयार होणाऱ्या कचऱ्यामध्ये सुका कचरा अधिक होता. यामध्ये भेटवस्तूंचे कागद, फटाक्यापासून तयार होणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण अधिक होते. दिवाळीच्या काळात शहरातील कचरा रोजच्या रोज उचलला जावा, यासाठी आवश्यक ते नियोजन घनकचरा विभागाकडून करण्यात आले होते. 'घनकचरा विभागातील कर्मचाऱ्यांना तसेच दररोज कचरा गोळा करणाऱ्या सेवकांनाही दिवाळीचा सण साजरा करता यावा, यासाठी आवश्यक ती व्यवस्था करावी,' अशा सूचना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आरोग्य निरिक्षकांना दिल्या होत्या. 'शहरातील कोणत्याही भागांतील कचरा सणाच्या काळात रस्त्यावर तसाच पडून राहू नये, यासाठी आवश्यक ती काळजी घेण्यात आली. त्यामुळे दिवाळीच्या सणामध्ये अडचणी आल्या नाहीत,' असे घनकचरा विभागाचे उपायुक्त संदीप कदम यांनी सांगितले. दिवाळीला सुरुवात होण्यापूर्वी नागरिक जुन्या गाद्या, फर्निचर तसेच न लागणाऱ्या वस्तू कचऱ्यात टाकून देतात. घराची स्वच्छता करताना या वस्तू सर्रासपणे नदीपात्राजवळ तसेच रात्रीच्या वेळी रस्त्यावर टाकून दिल्या जातात. अनेकदा हा कचरा उचलला जात नाही. या पार्श्वभूमीवर यंदाच्या वर्षी महापालिकेच्या घनकचरा विभागाने विशेष मोहिम राबविली होती. फर्निचर, गाद्या, गोधड्या, उशा हा कचरा गोळा करण्यासाठी महापालिकेने मोहीम राबवून नागरिकांकडून या वस्तू गोळा केल्या. असे कदम यांनी सांगितले.

शहरात लक्ष्मीपूजनाच्या दुसऱ्या दिवशी मोठ्या प्रमाणात कचरा जमा झाला होता. हा कचरा सकाळी लवकर उचलला जाण्यासाठी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती. यासाठी प्रत्येकावर जबाबदारी निश्चित केली होती. सणाच्या काळात शहरातील कोणत्याही भागांत आणि रस्त्यावर कचरा दिसू नये, अशा सूचना महापालिका आयुक्तांनी दिल्या होत्या. महापालिका आयुक्त शहरातील विविध भागात भेट देऊन पाहणी करत होते.

# मोटारीच्या धडकेत दुचाकीस्वार डेअरी कर्मचाऱ्याचा मृत्यू

**पुणे** : भरधाव मोटारीच्या धडकेत दुचाकीस्वार डेअरी कर्मचारी तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना हडपसर भागातील महंमदवाडी परिसरात घडली. याप्रकरणी मोटार चालकासह चौघांना पोलिसांनी अटक केली. सनी अंबादास मिसाळ (वय २७, रा. ललकार मित्र मंडळाजवळ, ताडीवाला रस्ता) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वार तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी मोटार चालक अमान समीर मणियार (वय २१, रा. हांडेवाडी), अरेझा निझाद इंजिनिअर (वय २१, रा. उंड्री), पार्थ राकेश पांडे (वय २३, रा. रावेत, पिंपरी-चिंचवड), तरुण महेश निहलानी (वय २६, रा. उंड्री) यांना अटक करण्यात आली. याबाबत मिसाळ याच्या भावाने काळेपडळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मिसाळ हा एका खासगी दूध डेअरीत पर्यवेक्षक आहे. २१ ऑक्टोबर रोजी डेअरीतील एका कर्मचाऱ्याने सुट्टी घेतली होती. त्यामुळे मिसाळ हा सकाळी साडेसहाच्या सुमारास महंमदवाडी परिसरातून कामावर निघाला होता. रहेजा व्हिस्टा सोसायटीसमोर भरधाव मोटारीने दुचाकीस्वार मिसाळला धडक दिली. अपघातात मिसाळ गंभीर जखमी झाला. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली.